# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 23/10/2023 (सोमवार) सकाळ

---

## चोरी

**पो.स्टे. रामटेक** :– अंतर्गत ०१ कि.मी. अंतरावरील रामाळेश्वर वार्ड रामटेक येथे दिनांक २१/१०/२०२३ चे २०.०० वा. ते दिनांक २२/१०/२०२३ चे ०६.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– उमेश गजाननराव भरणे, वय ३६ वर्ष रा. मानापुर ता. रामटेक यांचे दुकानाचे शटर खोलुन ड्राव्हरमध्ये ठेवलेले नगदी रोख रक्कम १०,०००/– रू २) सोन्याचा डस्ट ०४ ग्रॅम किंमती १५,०००/– रू. असा एकुण २५,०००/– रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक लांजेवार मो. नं. ९७६४१९०९५१ हे करीत आहे.

## दुखापत

**पो.स्टे. खापरखेडा** :– अंतर्गत ०८ कि. मी. अंतरावरील वलनी येथे दिनांक २१/१०/२०२३ चे १९.०० वा. ते १९. १५ वा. दरम्यान फिर्यादी नामे– निखिल नारायण पाटील, वय २६ वर्ष, रा. वार्ड क्रमांक तीन दहेगाव रंगारी हा आपले फिल्टर दुरुस्तीचे पैसे मागण्याकरिता **आरोपी नामे– पंकज अशोक तांदुळकर रा. वलनी** यांच्या घरी गेले असता यातील आरोपी यानी म्हटले की आज माझ्याकडे पैसे नाही आहे असे म्हणून झगडा भांडण करून शिवीगाळी केली व लोखंडी रॉडने फिर्यादीच्या डाव्या हाताच्या दंडावर व डाव्या कानावर मारून जखमी केले व पुन्हा मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार बेलसरे पोस्टे खापरखेडा मो. नं. ९९२३५९५४३७ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर